महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन उपक्रम)
सीआयएन : यु४०१०९एमएच२००५एसजीसी१५३६४५

मुख्य अभियंता (देयक व विश्लेषण)
४ था मजला, प्रकाशगड,प्लॉट क्र. जी-९, प्रा. अनंत काणेकर मार्ग,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
दुरध्वनी क्र. ०२२-६९८५२२०० (का.)/विस्तारित क्र. २४६१
संकेतस्थळ : www.mahadiscom.in
ई - मेल : cebilling@mahadiscom.in

क्र. मु.अ.(दे. व वि.)/अभय योजना/२०२६-२७/३७६२१ दिनांक: ०४ नोव्हेंबर २०२६

देयक व विश्लेषण परिपत्रक नं.: ०९/२०२६

विषय: कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित (PD) करण्यात आलेल्या उच्चदाब व लघुदाब ग्राहकांसाठी " अभय योजना २०२६-२७" राबविण्याबाबत.

महावितरणकडे कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित केलेल्या ग्राहकांकडे मोठ्या प्रमाणात वीजदेयकाची थकबाकी प्रलंबित आहे. सदर दीर्घकाळ प्रलंबित असलेली थकबाकी वसूल करण्यासाठी तसेच अधिकाधिक ग्राहकांना थकबाकीचा भरणा करण्यास प्रोत्साहित करण्याच्या दृष्टीने अधिक आकर्षक व सुनियोजित संधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता आहे.

त्यानुसार, महसूल वसुलीत वाढ करणे, पात्र ग्राहकांना थकबाकीचा सुलभ भरणा करणे तसेच वीजपुरवठा पुनर्जोडणी उपलब्ध करून देणे या उद्देशाने सक्षम अधिकारी यांनी **"अभय योजना २०२६-२७"** मान्यता दिली आहे. या योजनेअंतर्गत पात्र ग्राहकांना विहित अटींनुसार विविध सवलती, सूट व भरणा करण्यासाठी सुलभ पर्याय उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

खाली नमूद केलेल्या तरतुदींनुसार सदर योजनेची सर्व क्षेत्रीय कार्यालयांनी काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

१. योजनेचे स्वरूप व पात्रता

१.१. कृषी व सार्वजनिक पाणीपुरवठा (PWW) ग्राहक वगळता, सर्व वर्गवारीतील उच्चदाब (HT) व लघुदाब (LT) ग्राहक, ज्या ग्राहकांचा वीजपुरवठा दिनांक **३१.०३.२०२६ रोजी किंवा त्यापूर्वी कायमस्वरूपी खंडित** करण्यात आलेला आहे, ते ग्राहक या योजनेस पात्र राहतील.

१.२. या योजनेसाठी दिनांक ३१.०३.२०२६ रोजी प्रलंबित असलेली वीज देयकाची थकबाकी विचारात घेण्यात येईल.

१.३. महावितरणविरुद्ध न्यायालयीन दावा अथवा खटला प्रलंबित असलेल्या ग्राहकांना संबंधित प्रकरण कोणत्याही अटीशिवाय मागे घेतल्यानंतर या योजनेचा लाभ घेता येईल.

१.४. **तात्पुरता वीजपुरवठा खंडित (TD) ग्राहकांसाठी विशेष तरतूद:** ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत तात्पुरत्या खंडित (TD) स्थितीत असलेले, ज्या ग्राहकांचा वीजपुरवठा प्रत्यक्षात खंडित करण्यात आलेला आहे व माहिती तंत्रज्ञान प्रणालीमध्ये TD टॅग नोंदविण्यात आलेला आहे आणि ज्या ग्राहकांचा वीज वापर नाही असे ग्राहक देखील या योजनेसाठी पात्र राहतील.

१.५. सदर योजना वितरण फ्रँचायझी (Distribution Franchisee - DF) क्षेत्रांतील वीज ग्राहकांना देखील लागू राहील.

२. योजनेचा कालावधी

सदर योजना दिनांक **०६.११.२०२६ ते १५.०१.२०२७** या कालावधीत लागू राहील.

३. योजनेअंतर्गत देय सवलती व लाभ

या योजनेचे लाभ पात्रतेच्या निकषांमध्ये नमूद केलेल्या सर्व पात्र ग्राहकांना लागू राहतील.

३.१. कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित झाल्याच्या दिनांकापासून अर्ज करण्याच्या दिनांकापर्यंत आकारण्यात आलेल्या व्याजासह थकबाकीवरील व्याजामध्ये १००% सूट देण्यात येईल.

३.२. या योजनेत सहभागी होण्यापूर्वी अंतिम वीज देयकामध्ये दर्शविण्यात आलेल्या विलंब आकार थकबाकीवर (Delayed Payment Charges - DPC) १००% सूट देण्यात येईल.

३.३. तात्पुरता वीजपुरवठा खंडित केल्याच्या दिनांकापासून कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित होईपर्यंतच्या कालावधीतील मागणी आकार (Demand Charges) / स्थिर आकार (Fixed Charges) माफ करण्यात येईल.

३.४. या योजनेंतर्गत लागू असलेल्या सवलती व समायोजनांचा लाभ दिल्यानंतर उर्वरित पात्र मूळ थकबाकीची रक्कम ग्राहकास भरणे बंधनकारक राहिल.

३.५. लघुदाब (LT) ग्राहकांना एकरकमी भरणा किंवा मंजूर व्याजमुक्त हप्त्यांद्वारे भरणा करण्याचा पर्याय उपलब्ध राहील.

३.६. उच्चदाब (HT) ग्राहकांना संबंधित थकबाकीच्या रकमेच्या टप्प्यानुसार (Slab-wise) निर्धारित केलेल्या भरणा पद्धतीनुसार योजनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे संपूर्ण थकबाकीची एकरकमी रक्कम किंवा मंजूर व्याजमुक्त हप्त्यांमध्ये भरणा करणे आवश्यक राहील.

३.७. प्रीपेड स्मार्ट मीटरचा पर्याय निवडणाऱ्या व २० किलोवॅटपर्यंत जोडभार (Sanction Load) असलेल्या ग्राहकांना देय मूळ थकबाकीच्या रकमेवर अतिरिक्त ५% सवलत देण्यात येईल. सदर सवलतीची रक्कम पुनर्जोडणी दिल्यानंतर प्रीपेड मीटर खात्यात जमा करण्यात येईल.

३.८. महावितरणच्या कालावधीतील थकबाकी असलेले वितरण फ्रँचायझी (DF) क्षेत्रातील कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित (PD) ग्राहक तसेच चालू (Live) ग्राहक या योजनेच्या लाभासाठी महावितरणची थकबाकी भरण्यास पात्र राहतील.

४. मूळ थकबाकीवरील सवलत (प्रारंभिक लाभ Early-Bird Incentive)

पात्र ग्राहकांना थकबाकीच्या कालावधीनुसार (Ageing) खालीलप्रमाणे मूळ थकबाकीवर सवलत देण्यात येईल.

ग्राहक वर्गवारी	थकबाकीचा कालाबधी ३ वर्षांपेक्षा कमी	थकबाकीचा कालाबधी ३ वर्षांपेक्षा अधिक
LT निवासी व वाणिज्यिक	१०%	२०%
HT निवासी, वाणिज्यिक, औद्योगिक, सार्वजनिक सेवा (PS) व इतर तसेच LT औद्योगिक, सार्वजनिक सेवा (PS) व केवळ कृषी इतर (परंतू कृषी वगळून)	१०%	१५%

४.१. हप्त्यांचा पर्याय निवडणाऱ्या ग्राहकांना वरील प्रारंभिक लाभाची सवलत उपलब्ध राहणार नाही.

४.२. प्रारंभिक लाभास पात्र असलेल्या ग्राहकांनी मूळ थकबाकीची संपूर्ण रक्कम एक रकमी दि. १५.१२.२०२६ पर्यंत किंवा त्यापूर्वी भरणे बंधनकारक आहे.

५. वसुली दावे व न्यायालयीन प्रकरणे

५.१. महावितरणनतर्फे थकबाकी वसुलीसाठी न्यायालयीन अथवा कायदेशीर कारवाई सुरू केली असल्यास, लागू असलेला कायदेशीर खर्च (Legal Charges) ग्राहकाकडून देय रकमेव्यतिरिक्त वसूल करण्यात येईल.

५.२. योजनेच्या सर्व अटींची पूर्तता होऊन लागू असलेली संपूर्ण देय रक्कम भरल्यानंतर वसुलीची कारवाई मागे घेण्याची प्रक्रिया करण्यात येईल.

५.३. योजनेचा लाभ घेतल्यानंतर ग्राहकाने महावितरणविरुद्ध न्यायालयीन दावा अथवा खटला दाखल केल्यास, त्यास मंजूर करण्यात आलेले योजनेचे लाभ रद्द करण्यात येतील.

६. वीज पुरवठा पुनर्जोडणी देणे

या योजनेअंतर्गत वीजपुरवठ्याची पुनर्जोडणी देण्यासाठी खालील अटी लागू राहतील.

६.१. उच्चदाब (HT) ग्राहक

अ) हप्त्यांद्वारे भरणा करण्याचा पर्याय निवडल्यास, ग्राहकाने मंजुरीच्या दिनांकापासून ७ दिवसांच्या आत मूळ थकबाकीच्या ५०% रकमेसह १००% कायदेशीर शुल्क लागू असल्यास भरणा करण्यात यावा.

ब) उर्वरित रक्कमेचा खालीलप्रमाणे मासिक हप्त्यांमध्ये भरणा करण्यात यावा.

- थकबाकी ५० लाख रुपयांपर्यंत असल्यास, उर्वरित रक्कम कमाल ३ मासिक हप्त्यांमध्ये भरता येईल.
- थकबाकी ५० लाख रुपयांपेक्षा अधिक असल्यास, उर्वरित रक्कम कमाल ६ मासिक हप्त्यांमध्ये भरता येईल.

६.२. लघुदाब (LT) ग्राहक

अ) हप्त्यांद्वारे भरणा करण्याचा पर्याय निवडल्यास, ग्राहकाने मंजुरीच्या दिनांकापासून ७ दिवसांच्या आत मूळ थकबाकीच्या किमान ५०% रकमेसह लागू असलेले १००% कायदेशीर शुल्क भरावे.

ब) उर्वरित रक्कम पुढील सलग महिन्यांमध्ये समान हप्त्यांत, कमाल ६ हप्त्यांमध्ये भरावी.

६.३. वीज पुरवठा पुनर्जोडणी देण्यासाठी अटी

अ) उच्चदाब (HT) व लघुदाब (LT) या दोन्ही संवर्गांतील ग्राहकांचे पुनर्जोडणी शुल्क माफ करण्यात येईल.

ब) लघुदाब (LT) ग्राहकांचे सेवा जोडणी शुल्क (Service Connection Charges) देखील माफ करण्यात येईल.

क) वीजपुरवठ्याची पुनर्जोडणी देताना ग्राह्य आधार कार्ड सादर करणे तसेच विद्युत पुरवठा संहिता (Supply Code) व महावितरणच्या नियमांनुसार लागू असलेली सुरक्षा ठेव (Security Deposit), कायदेशीर शुल्क व इतर लागू शुल्क भरणे क्रमप्राप्त राहील.

ड) वीजपुरवठ्याची पुनर्जोडणी अनिवार्यपणे स्मार्ट मीटरद्वारेच करण्यात येईल.

७.१. मंजूर हप्त्यांच्या कालावधीत सदर हप्त्यांवर कोणतेही विलंब आकार (DPC) आकारण्यात येणार नाहीत.

७.२. प्रारंभिक लाभास पात्र असलेल्या ग्राहकांनी संपूर्ण देय मूळ थकबाकी दिनांक **१५.१२.२०२६** रोजी किंवा त्यापूर्वी भरल्याची खात्री करावी.

७.३. वीजपुरवठ्याची पुनर्जोडणी देण्यात आलेली असो अथवा नसो, मंजूर हप्त्यांचा भरणा विहित देय दिनांकानुसार करणे बंधनकारक राहील.

७.४. वीजपुरवठ्याची पुनर्जोडणी दिल्यानंतर ग्राहकांनी चालू वीज देयके भरणे क्रमप्राप्त आहे. तसेच योजनेअंतर्गत मंजूर हप्त्यांचाही नियमानुसार भरणा करण्यात यावा.

७.५. मंजूर कालावधीत संपूर्ण देय रकमेचा भरणा न केल्यास योजनेअंतर्गत असलेले लाभ रद्द करण्यात येतील व नियमांनुसार लागू होणारे विलंब आकार (DPC) वसूल करण्यात येईल.

८. अर्ज व मंजुरी प्रक्रिया

८.१. पात्र ग्राहकांनी विहित नमुन्यातील हमीपत्र (Undertaking) व आवश्यक पूरक कागदपत्रांसह विहित ऑनलाइन पोर्टल / मोबाईल ॲपद्वारे अर्ज सादर करावा.

८.२. ज्या अर्जांमध्ये कोणताही वाद, न्यायालयीन प्रकरण किंवा वीज देयकासंबंधी तक्रार प्रलंबित नाही, अशा एकरकमी भरणा किंवा हप्त्यांचा पर्याय निवडलेल्या अर्जांसाठी पूर्वमंजुरीची आवश्यकता राहणार नाही. असे अर्ज स्वयंचलितपणे मंजूर करण्यात येतील.

८.३. न्यायालयीन प्रकरणे प्रलंबित असलेल्या ग्राहकांच्या बाबतीत संबंधित उपविभाग / विभाग / मंडळ कार्यालयाने खालील बाबींची पडताळणी करावी.

- योजनेअंतर्गत ग्राहकाची पात्रता.
- प्रलंबित थकबाकीची अचूकता.
- वीज देयकाची अचूकता.
- समायोजनाच्या प्रलंबित बाबी, असल्यास.

८.४. न्यायालयीन प्रकरणांशी संबंधित अर्जांसाठी योजनेअंतर्गत मंजुरी देणारे सक्षम अधिकारी खालीलप्रमाणे असतील.

- **उच्चदाब (HT) ग्राहक:** मुख्य अभियंता, परिमंडळ (सं. व सु).
- **लघुदाब (LT) ग्राहक:** कार्यकारी अभियंता, विभाग (सं. व सु).

८.५. योजनेतील विहित तरतुदींच्या बाहेरील अपवादात्मक प्रकरणांचा निर्णय मा. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक (Hon. Chairman & Managing Director - CMD) हे मा. संचालक (वाणिज्य) यांच्या सल्लामसलतीने करतील.

९. अंमलबजावणी व संनियंत्रण

९.१. वृत्तपत्रे, दूरचित्रवाणी, रेडिओ, समाजमाध्यमे, व्हॉट्सॲप / एसएमएस व स्थानिक प्रसिद्धी माध्यमांद्वारे योजनेची व्यापक प्रसिद्धी करण्यात यावी.

९.२. पात्र ग्राहकांना योजनेच्या तपशीलासह विशेष नोटिस त्यांच्या आस्थापनेच्या / जागेच्या पत्त्यावर बजावण्यात याव्यात. लघुदाब (LT) ग्राहकांसाठी उपविभागीय कार्यालयांनी व उच्चदाब (HT) ग्राहकांसाठी परिमंडळ कार्यालयांनी ही कार्यवाही करावी.

९.३. पात्र उच्चदाब (HT) व लघुदाब (LT) कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित (PD) ग्राहकांची यादी मोबाईल ॲपवर उपलब्ध करून देण्यात यावी. योजनेची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी सदर यादीतील १००% ग्राहकांची पडताळणी करण्यात यावी.

९.४. योजनेच्या कालावधीत थकबाकी वसुलीसाठी विशेष मोहीम राबविण्यात यावी.

९.५. संबंधित मुख्य अभियंता (सं. व सु)यांनी योजनेच्या प्रगतीवर बारकाईने लक्ष ठेवावे. या योजनेअंतर्गत झालेली वसुली ही आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी कर्मचाऱ्यांच्या वार्षिक गोपनीय अहवालाचे (ACR) मूल्यमापन करताना कामगिरीच्या निकषांपैकी एक निकष म्हणून विचारात घेण्यात येईल.

९.६. योजनेची प्रभावी अंमलबजावणी व जास्तीत जास्त ग्राहकांपर्यंत पोहोचविण्यास सुनिश्चित करण्यासाठी आवश्यकतेनुसार अंमलबजावणी यंत्रणा व अतिरिक्त मनुष्यबळाचा वापर करण्यात यावा.

सर्व क्षेत्रीय कार्यालयांनी **"अभय योजना - २०२६-२७"** या योजनेच्या मंजूर अटी व शर्तींचे काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. मंजूर तरतुदींपासून कोणताही बदल करण्यास सक्षम अधिकाऱ्याची पूर्व मंजुरी घेणे आवश्यक राहील.

सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वरील सूचनांची नोंद घेऊन योजनेची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यात यावी.

मुख्य अभियंता (देयक व विश्लेषण)

प्रत:
वितरण यादीप्रमाणे.